## प्रेसनोट

अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती
दिनांक : ०६.११.२०२३

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नाव | अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती घटक,अमरावती. |
| २ | आरोपीचे नाव, हुददा व कार्यालयाचा पत्ता | श्री.सारंग विलास पांडे, वय ३३ वर्षे, पद — महसुल सहायक, तहसिल कार्यालय, अमरावती, रा. दस्तुरनगर, अमरावती. वर्ग—३ |
| ३ | अपराध घडला तारीख व वेळ | दि.०६/११/२०२३ चे १६/२० ते १६/५० वा.दरम्यान |
| ४ | मागणी केली लाच रक्कम | ५००/—रुपये |
| ५ | तडजोडीअंती लाच रक्कम | ४००/— रूपये |
| ६ | स्विकारलेली लाच रक्कम | ४००/— रूपये |
| ७ | घटनास्थळ | रेकॉर्ड रूम तहसिल कार्यालय अमरावती |

**थोडक्यात हकिकत** :यातील तक्रारदार यांनी दिनांक ०६/११/२०२३ रोजी तक्रार दिली की, महसुल सहायक श्री.सारंग विलास पांडे हे त्यांनी तक्रारदार यांनी त्यांचे आईचे वतीने दिनांक २७/०९/२०२३ रोजी कै.नारायणराव पेटले यांचे मौजे बडनेरा, ता.जि.अमरावती सर्व्हे नं.६८/२ मधील शेत जमीनीचे वादाबाबतचे प्रकरणाचे कागदपत्रे मिळणेकरीता तहसिल कार्यालय अमरावती येथील अभिलेख कक्षात रितसर अर्ज केला होता.त्यावेळी त्या कार्यालयात हजर असलेले महसुल सहायक श्री. पांडे यांनी तक्रारदार यांना १००/— रू. ची पावती फाडण्यास सांगितली.त्यानुसार तक्रारदार यांनी १००/— रू. ची पावती रितसर फाडुन नियमाप्रमाणे फि भरून पावती घेतली फि भरल्यानंतरही त्यांचे कागदपत्रे देण्याकरीता ५००/— रूपये लाचेची मागणी करीत असल्याची तक्रार दिली.

वरून सदर तक्रारीची दिनांक ०६/११/२०२३ रोजी तहसिल कार्यालय,अमरावती येथे जावुन पंचासमक्ष पडताळणी केली असता आरोपी लोकसेवक महसुल सहायक श्री.पांडे यांनी तक्रारदार श्री.डकरे यांना त्यांनी दिलेल्या तक्रारीप्रमाणे त्यांना त्यांची आई श्रीमती कमल सुरेश डकरे हिने तिचे वडील कै. नारायणराव पेटले यांचे मौजे बडनेरा, ता.जि.अमरावती सर्व्हे नं.६८/२ मधील शेत जमीनीचे वादाबाबतचे प्रकरणाचे कागदपत्रे देणेकरीता यापुर्वी दिलेल्या १००/— रुपयाचे पावती व्यक्तीरिक्त ४००/— रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. वरून लगेच सापळा कारवाई आयोजित केली असता महसुल सहायक श्री.पांडे यांनी ४००/— रूपये लाच रक्कम तक्रारदार यांचेकडुन तहसिल कार्यालय, अमरावती येथे पंचासमक्ष स्विकारली वरुन आजरोजी वर नमुद आरोपी लोकसेवक यांना ताब्यात घेण्यात आले असून त्यांचेविरुध्द पो.स्टे.सीटी कोतवाली अमरावती शहर येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कार्यवाही मा.श्री.मारुती जगताप, पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अमरावती परिक्षेत्र अमरावती,श्री.देविदास घेवारे, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अमरावती परिक्षेत्र अमरावती, श्री. मिलींदकुमार बहाकर, पोलीस उपअधिक्षक, ला.प्र.वि.अमरावती यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि. विजया पंधरे, पोलीस अंमलदार,युवराज राठोड,मनोज यादव पोहवा विनोद धुळे पोशी उपेंद्र थोरात चापोहवा चंद्रकांत जनबंधु यांनी पार पाडली.

नागरीकांनी अशाच प्रकारे भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे असे आवाहन करण्यात येत आहे.

संपर्क: अॅन्टी करप्शन ब्युरो, ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती,ऑफीस फोन नं. ०७२१—२५५२३५५, मो.न.७०२०६९३४८१, टोल फ्रि नंबर—१०६४.

(विजया पंधरे)
पेलीस निरीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती